NAVJYOT / Vol. XIV / Issue – I ISSN 2277-8063

# भारतीय निवडणूक प्रक्रियेतील नोटा (NOTA) पर्यायाचे मूल्यमापन

**रविराज संजीव दाभाडे**

संशोधक विद्यार्थी,राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. संपर्क: ७७४५०२६६२१

---

**सारांश:**

भारतामध्ये लोकशाही प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक म्हणजे मतदानाचा अधिकार. २०१३ पासून 'None of the Above' (NOTA) हा पर्याय भारतीय निवडणुकीत समाविष्ट करण्यात आला, ज्यामुळे मतदारांना कोणत्याही उमेदवाराला नकार देण्याचा अधिकार मिळाला. सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिला, आणि यानंतर भारतीय निवडणुकीत NOTA चा वापर सुरू झाला. या शोधपत्रिकेचा उद्देश NOTA पर्यायाच्या भारतीय निवडणूक प्रक्रियेवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे आहे.

या शोधनिबंधात NOTA पर्यायाची अंमलबजावणी, त्याची उपयुक्तता आणि त्याच्या प्रभावीतेचे विश्लेषण केले गेले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर, NOTA पर्यायाच्या वापराने मतदारांच्या गोपनीयतेच्या अधिकाराचे रक्षण केले आहे, तसेच मतदान न करण्याचा अधिकार लोकशाहीला आणखी सुदृढ करण्याचा एक साधन ठरला आहे. तथापि, या पर्यायामुळे गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांची संख्या कमी होईल आणि मतदानाची टक्केवारी वाढेल, या अपेक्षांमध्ये तेवढा बदल दिसून आलेला नाही.

शोधनिबंधात दिलेल्या आकडेवारीनुसार, २००९ ते २०२४ पर्यंत लोकसभेच्या निवडणुकांमध्ये गुन्हेगारी खटले असलेल्या उमेदवारांची संख्या वाढली आहे, तसेच NOTA पर्यायामुळे मतदानाची टक्केवारी सुद्धा अपेक्षेप्रमाणे वाढलेली नाही. या परिस्थितीमुळे, NOTA पर्यायाने त्याच्या मूळ उद्देशाला किती प्रभावीपणे साधले आहे, याबद्दल प्रश्न उपस्थित होतो.

शोधनिबंधाच्या निष्कर्षानुसार, NOTA पर्यायामुळे मतदारांना नकार व्यक्त करण्याचा अधिकार मिळाला आहे, ज्यामुळे लोकशाहीत पारदर्शकता आणि जागरूकता वाढली आहे. तथापि, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांची संख्या कमी होणे आणि मतदानाची टक्केवारी वाढवणे यासंदर्भातील अपेक्षांकडे पाहता, अधिक सुधारणा आवश्यक ठरते.

NOTA पर्याय प्रभावीपणे 'नकारात्मक मतदानाचा अधिकार' बनण्यासाठी सुधारणा आणि अंमलबजावणीसाठी अधिक कार्यवाहीची आवश्यकता आहे, जेणेकरून तो एक वास्तविक 'नाकाराधिकार' बनू शकेल.

**Key Words :**

नोटा (NOTA), मतदान, नकाराधिकार, गोपनीयता, निवडणूक, लोकशाही.

**प्रस्तावना:**

लोकशाहीच्या प्रक्रिया आणि निवडणुकीच्या महत्वाच्या अंगांपैकी एक म्हणजे मतदारांचा मतदानाचा अधिकार. भारतातील निवडणूक प्रक्रिया हे देशाच्या लोकशाहीतला एक महत्त्वाचा आधार आहे, ज्यामुळे नागरिकांना त्यांच्या इच्छेनुसार प्रतिनिधींची निवड करण्याची संधी मिळते. तथापि, प्रत्येक निवडणुकीत सर्व उमेदवारांसाठी मतदारांची नापसंती व्यक्त करण्याचा अधिकार महत्त्वाचा ठरतो. 'None of the Above' (NOTA) किंवा 'वरीलपैकी एकही नाही' हा पर्याय या विचारावर आधारित आहे, जो भारतीय निवडणुकीत २०१३ पासून अस्तित्वात आला. हा पर्याय मतदारांना कोणत्याही उमेदवाराला मत न देण्याचा अधिकार प्रदान करतो.

सर्वोच्च न्यायालयाने या पर्यायावर निर्णय दिला, त्यानंतर NOTA पर्याय निवडणुकीत समाविष्ट केला गेला, परंतु यामुळे लोकशाही आणि निवडणुकीच्या प्रक्रियेवर काही विशिष्ट परिणाम झाले की नाही, याचा तपास आवश्यक ठरतो. या शोधनिबंधामध्ये, NOTA पर्यायामुळे भारतीय निवडणूक प्रक्रियेवर काय परिणाम झाले आहेत याचे विश्लेषण केले आहे. या शोधनिबंधाच्या माध्यमातून NOTA पर्यायाची प्रभावीता, त्याची उपयुक्तता, आणि त्याच्या परिणामकारकतेचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**उद्दिष्ट :**

NOTA पर्यायाची भारतीय निवडणूक प्रक्रियेतील भूमिका आणि त्याचे परिणाम तपासणे.

**गृहीतके :**

सदर संशोधनाकरिता खालील गृहीतके स्वीकारली आहेत,

१) NOTA पर्यायाच्या वापरामुळे मतदारांचा गोपनीयता अधिकार जपला जातो.

२) NOTA पर्यायामुळे निवडणुकीतील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांची संख्या कमी झाली असेल.

३) NOTA पर्यायामुळे मतदानाची टक्केवारी वाढली असेल.
४) NOTA पर्यायाचा वापर लोकशाही सुदृढ करण्यासाठी एक साधन ठरेल.

**संशोधन पद्धती :**

संशोधन पद्धतीमध्ये विश्लेषणात्मक आणि सांख्यिकीय पद्धतींचा समावेश आहे. विविध निवडणुकींमध्ये NOTA पर्यायाच्या वापराचे परिणाम आणि त्याच्या प्रभावाचा अभ्यास केला आहे.

**विषयाचे विवेचन :**

निवडणुकीत एखाद्या मतदारास कोणत्याही उमेदवारास मतदान करावयाचे नसेल तर, त्यास गोपनीयतेचा अधिकार बजावत आपले मतदान करता यावे, यासाठी 'None of the Above'/ 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) पर्याय उपलब्ध असतो.

भारतामध्ये सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. (C) क्रमांक-१६१/२००४, People's Union for Civil Liberties & other V/s. Union of India & other द्वारे दि. २७/०९/२०२३ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश पी. सथाशिवम तसेच न्यायमूर्ती रंजना प्रकाश व न्यायमूर्ती रंजन गोगोई या त्रिसदस्य खंडपीठाने निवडणूक आयोगाला 'None of the Above'/ 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) पर्याय मतपत्रिका तथा ईव्हीएम वर मतदारांसाठी उपलब्ध करावा अशा पद्धतीचे निर्देश दिले.

असा निकाल देताना या खंडपीठासमोर फ्रान्स, बेल्जियम, ब्राझील, ग्रीस, युक्रे, चिली, बांग्लादेश, स्टेट ऑफ नेवादा (युएसए), फिनलँड, स्वीडन, अमेरिका, कोलंबिया आणि स्पेन इत्यादी तेरा देशांची तटस्थ मत/ निषेधार्थ मत/ नकारार्थी मत यासंदर्भातील उदाहरणे समोर होती. याबरोबरच संसदेमध्ये सदस्यांना एखाद्या मतदानावेळी तीन प्रकारचे पर्याय उपलब्ध असतात, जसे की- Ayes, Noes आणि Abstain (होय, नाही आणि तटस्थ) म्हणजेच संसद सदस्यांना जर मतदानावेळी तटस्थ राहण्याचा अधिकार मिळात असेल तर सर्वसामान्य मतदाराला देखील असा पर्याय उपलब्ध असणे गरजेचे आहे, असे मत न्यायालयाने नोंदवले.

तरी देखील, भारतात NOTA म्हणजे पूर्णतः नकाराधिकार असे म्हणता येत नाही. कारण निवडणुकीत NOTA ची संख्या कितीही असली तरी सर्वाधिक मते मिळवणारा उमेदवार निवडणूक विजयी ठरतो.

**NOTA पूर्वी :**

NOTA पर्याय मतदारांना उपलब्ध होण्यापूर्वी देखील भारतामध्ये 'मतदान न करण्याचा' कायदेशीर अधिकार अस्तित्वात होता. निवडणूक अधिनियम, १९६१ द्वारे 'कलम ४९ (O) नुसार मतदाराला जर मतदान करायचे नसेल तर 'फॉर्म १७अ' भरून, त्यावर आपला मतदार यादी क्रमांक नोंदवून, मत नाकारण्याचे कारण तेथील निवडणूक अधिकारी समक्ष लिहावे लागे. यावर निवडणूक अधिकारी व मतदार यांची स्वाक्षरी घ्यावी लागे. या नियमाने गोपनीयेतेच्या अधिकाराचे उल्लंघन होत होते.

मतदाराला मतदानाचा अधिकार देणे तसेच मतदान न करण्याचा अधिकार असणे महत्वाचे आहेच, यासोबत त्यांचा गोपनीयतेचा अधिकार देखील अबाधित राहणे लोकशाहीमध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. मुक्त आणि निष्पक्ष निवडणूक ही संविधानाची मूलभूत रचना आहे आणि तिच्या कक्षेत मतदाराचा सूड, दबाव किंवा जबरदस्तीच्या भीतीशिवाय मतदान करण्याचा अधिकार अनिवार्यपणे समाविष्ट आहे. म्हणूनच मतदाराची ओळख संरक्षित करणे आणि गुप्तता राखणे हे मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकीचा अविभाज्य भाग आहे आणि मतदान करणारा मतदार आणि मतदान न करणारा मतदार यांच्यातील मनमानी फरक कलम १४ चे उल्लंघन करणारा आहे. अशा प्रकारे, दोन्ही श्रेणीतील व्यक्तींसाठी गुप्तता राखणे आवश्यक आहे.

NOTA पर्याय उपलब्ध झाल्याने मतदाराचा गोपनीयतेचा अधिकार हा सुरक्षित राहून मतदारास निर्भयपणे आपला मतदानाचा अधिकार बजावणे शक्य झाले आहे.

**NOTA ची अंमलबजावणी :**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार भारतीय निवडणूक आयोगाने २०१३ पासून 'मिझोरम, छत्तीसगड, राजस्थान, मध्यप्रदेश आणि दिल्ली' या विधानसभा निवडणुकीत NOTA चा पर्याय मतदारांना उपलब्ध करून दिला, तर २०१४ च्या देशातील सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीत प्रथमच NOTA चा देशपातळीवर वापर करण्यात आला.

**NOTA चा वापर :**

राज्यसंस्थेसमोर लोकशाही सुदृढ आणि मजबूत करण्यासाठी निवडणूक ही एक मोठी संधी आहे, ज्याद्वारे आपल्या नागरिकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी करून लोकशाहीला चालना देत नागरिकांचे मत जाणून घेता येते. NOTA पर्यायाची मागणी करणाऱ्या सामाजिक संस्था तसेच सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल यामध्ये मुख्यतः तीन गोष्टी NOTA द्वारे साध्य होणे अपेक्षित होते यामध्ये,

१) मतदारांना गोपनीयतेचा अधिकार अबाधित राखून नकारार्थी मत देता येणे.

२) जेव्हा मतदार नकारार्थी मत व्यक्त करतील तेव्हा राजकीय पक्षांना समजून जाईल की मतदार आपल्या उमेदवाराबद्दल नापसंती व्यक्त करीत आहेत, त्यामुळे उमेदवार घोषित करताना राजकीय पक्ष हे विचार करून स्वच्छ प्रतिमेच्या अथवा गुन्हेगारी पार्श्वभूमी नसणाऱ्या व्यक्तींनाच उमेदवारी घोषित करून निवडणुकीच्या रिंगणात उभे करतील.

३) मतदानाची संख्या वाढेल.

यातील पहिला मुद्दा तर NOTA पर्याय उपलब्ध झाल्याने योग्य ठरला आहे, पण इतर दोन मुद्दे अपेक्षस पात्र ठरल्या आहेत की नाही हे पाहणे गरजेचे आहे. खालील तक्तांच्या (तक्ता क्र. १, २, ३-१ व ३-२) आधारे आपण याचा पडताळा घेवू शकतो. NOTA पर्यायाच्या उपलब्धतेपासून लोकसभेच्या तीन निवडणुका आजवर झालेल्या आहेत, तर राज्यांच्या सरासरी तीन ते चार निवडणुका या NOTA पर्याय उपलब्ध असताना पार पडल्या आहेत.

**तक्ता क्र. १**

***लोकसभा निवडणूकीतील गुन्हेगार पार्श्वभूमीचे उमेदवार तथा खासदार यांची संख्या व टक्केवारी***

| लोकसभा निवडणूक | उमेदवार | | | खासदार | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण संख्या | गुन्हेगारी खटले | गंभीर गुन्हेगारी खटले | एकूण संख्या | गुन्हेगारी खटले | गंभीर गुन्हेगारी खटले |
| २००९ | ७८१० | ११५८ (१५%) | ६०८ (८%) | ५४३ | १६२ (३०%) | ७६ (१४%) |
| २०१४ | ८१६३ | १३९८ (१७%) | ८८९ (११%) | ५४२ | १८५ (३४%) | ११२ (२१%) |
| २०१९ | ७९२८ | १५०० (१९%) | १०७० (१३%) | ५३९ | २३३ (४३%) | १५९ (२९%) |
| २०२४ | ८३३७ | १६४३ (२०%) | ११९१ (१४%) | ५४३ | २५१ (४६%) | १७० (३१%) |

*(स्रोत-* असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रीफोर्म्स (ADR) या संस्थेचे अहवाल*)*

तक्ता क्र. १ मधील माहितीनुसार, लोकसभेच्या एकूण चार निवडणुकांमध्ये गुन्हेगारी खटले तसेच गंभीर गुन्हेगारी खटले असणारे उमेदवार आणि निवडणुकीद्वारे निवडून आलेले खासदार यांच्या संख्येत सातत्याने वाढ झालेली दिसते.

२००९ ते २०२४ पर्यंत ४ निवडणुकांच्या दरम्यान, गुन्हेगारी खटले असलेल्या उमेदवारांची संख्या वाढली आहे.

- २००९ मध्ये १५% उमेदवारांना गुन्हेगारी खटले होते, हे २०२४ मध्ये २०% झाले आहे.
- गंभीर गुन्हेगारी खटले असलेले उमेदवार देखील वाढले आहेत (२०२४ मध्ये १४%).
- त्याचप्रमाणे, खासदारांमध्ये २००९ मध्ये ३०% गुन्हेगारी खटले होते, हे २०२४ मध्ये ४६% झाले आहे.

जेव्हा मतदार NOTA पर्यायाचा वापर करतात, तेव्हा राजकीय पक्षांना गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले उमेदवार नाकारण्याची संधी मिळावी, अशी अपेक्षा होती तथापि, २००९ पासून २०२४ पर्यंत या गुन्हेगारी खटले असलेल्या उमेदवारांची संख्या वाढत गेली आहे. याचा अर्थ, राजकीय पक्षांनी उमेदवारांच्या निवडीमध्ये त्या अपेक्षेप्रमाणे सुधारणा केलेली नाही.

यामुळे, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने अपेक्षित असलेल्या परिणामांमध्ये दुसऱ्या मुद्द्यावर ठोस परिणाम झाला असे दिसत नाही.

NOTA पर्यायाच्या प्रभावामुळे मतदानाची संख्या वाढेल, अशीही अपेक्षा होती. परंतु, खालील तक्त्यांतील (तक्ता क्र. २) माहितीनुसार लोकसभा निवडणुकीतील मतदानाच्या टक्केवारीत काही चांगला बदल दिसत नाही.

***तक्ता क्र. २***

***(लोकसभा निवडणुकीतील वैध मते आणि NOTA पर्यायास मिळालेली मते)***

| लोकसभा निवडणूक | एकूण वैध मते | मतांची टक्केवारी | NOTA ची मते | NOTA ची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| २०१४ | ५४७८००००४ | ६६.४४% | ६००२९४२ | १.१०% |
| २०१९ | ६०७६५००५१ | ६७.४% | ६५२२७७२ | १.०७% |
| २०२४ | ६३८९९०६९२ | ६६.१% | ६३७१८३९ | १.००% |

*(स्रोत- भारत निर्वाचन आयोग, सांखिकी अहवाल)*

लोकसभा निवडणुकीत NOTA चे मतदान, २०१४ मध्ये १.१०% मतदान होते, २०१९ मध्ये १.०७%, आणि २०२४ मध्ये ते आणखी कमी होऊन १.००% झाले आहे. NOTA पर्यायामुळे मतदानाची संख्या अपेक्षेप्रमाणे वाढलेली नाही. NOTA मतदानाची टक्केवारी कमी झाली आहे, याचा अर्थ मतदारांची सक्रियता आणि निवडीची प्रक्रिया बदलली आहे, पण यामुळे मतदानाची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली नाही.

***तक्ता क्र. ३-१***

***दिल्ली विधानसभा निवडणुकीतील NOTA***

| दिल्ली विधानसभा निवडणूक | NOTA ची मते व टक्केवारी |
|---|---|
| २०१३ | ४९८८४ (०.६३%) |
| २०१५ | ३५८९७ (०.४०%) |
| २०२० | ४३१०९ (०.४६%) |

२०२३ मध्ये प्रथम 'मिझोरम, छत्तीसगड, राजस्थान, मध्यप्रदेश आणि दिल्ली' या विधानसभा निवडणुकीत NOTA चा पर्याय वापरात आणला गेला, तेंव्हापासून झालेल्या पुढील ३ निवडणुकांची आकडेवारी पहिली असता, असे दिसून येते की- सुरवातीस NOTA पर्यायाबाबत तेथील मतदारांमध्ये मोठी जागरूकता तसेच उत्सुकता असल्याचे दिसून येते, परंतु त्यांनतर पुढील निवडणुकीत मात्र NOTA पर्यायाची मते कमी कमी होताना दिसून येतात. *(पहा तक्ता क्र. ३-१ व ३-२)*

*(स्रोत- भारत निर्वाचन आयोग, सांखिकी अहवाल)*

***तक्ता क्र. ३-२***

***मिझोरम, छत्तीसगड, मध्यप्रदेश आणि राजस्थान विधानसभा निवडणुकांमधील NOTA***

| विधानसभा निवडणूक | NOTA ची मते व टक्केवारी | | | |
|---|---|---|---|---|
| | मिझोरम | छत्तीसगड | मध्यप्रदेश | राजस्थान |
| २०१३ | ३८१० (०.६६%) | ४०१०५८ (३.०७%) | ६४३१७१ (१.९०%) | ५८९९२३ (१.९१%) |
| २०१८ | २९३२ (०.४६%) | २८२७३८ (१.९८%) | ५४०६७३ (१.४२%) | ४६७९८८ (१.३१%) |
| २०२३ | २७७९ (०.४०%) | १९७६७८ (१.२६%) | ४२७७१० (०.९९%) | ३८३१०७ (०.९६%) |

*(स्रोत- भारत निर्वाचन आयोग, सांखिकी अहवाल)*

**राज्यसभा तथा राज्य परिषद :**

भारतीय निवडणूक आयोगाने २०१४ साली राज्यसभा निवडणुकीत देखील NOTA पर्याय सुरू केला परंतु सुप्रीम कोर्टाने दि. २१ ऑगस्ट २०१८ रोजी (रिट याचिका क्र. (C) क्रमांक-६३१/२०१७ शैलेश मनुभाई परमार वि. भारत निवडणूक आयोगाद्वारे मुख्य निवडणूक आयुक्त व इतर) हा पर्याय काढून टाकण्याचे निर्देश दिले.

राज्यसभा तथा राज्य परिषद येथील निवडणुका या अप्रत्यक्ष पद्धतीने घेतल्या जातात, संविधानातील पक्षांतर बंदी कायदा तसेच येथील निर्वाचन पद्धती ही वेगळी असल्याने NOTA हा पर्याय राजकीय पक्षांना एक प्रकारे निवडणुकीमध्ये चुकीच्या पद्धतीने निवडणूक प्रक्रियेत होण्याची संधी उपलब्ध करून देतो व भ्रष्टाचाराचा अवकाश निर्माण करून देतो, असे मत सरन्यायाधीश दीपक मिश्रा यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय खंडपीठाने नोंदवले.

**राज्य निवडणूक आयोग :**

महाराष्ट्र हे पहिले असे राज्य आहे ज्याने NOTA संदर्भात एक ऐतिहासिक निर्णय घेतला. महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने २०१८ मध्ये, जर निवडणुकीमध्ये NOTA ला सर्वात जास्त मते मिळाली तर तेथे नव्याने फेर निवडणूक घेतल्या जातील. म्हणजे NOTA या पर्यायास एक काल्पनिक उमेदवार म्हणून गृहीत धरण्याचे आयोगाने घोषित केले.

महाराष्ट्र पाठोपाठ हरियाणा मध्ये देखील तेथील राज्य निवडणूक आयोगाने २०१८ मध्ये असाच निर्णय घेतला तर २०२२ साली देशाच्या राजधानी दिल्ली येथे देखील या नियमाचा स्वीकार केला गेला.

**समारोप :**

NOTA ची मते 'अवैध' म्हणून वर्गीकृत केली जातात आणि निवडणूक निकालांमध्ये थेट योगदान देत नाहीत, ज्यामुळे ती परिणामकारक होण्याऐवजी प्रतीकात्मक बनतात.

नुकत्याच झालेल्या लोकसभा २०२४ च्या निवडणुकांमध्ये सुरत लोकसभा क्षेत्रात ज्या काही राजकीय घडामोडी घडल्या व तेथे भारतीय जनता पक्षाचा उमेदवार बिनविरोध निवडून आला. या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात या निवडीस आव्हान देणारी याचिका समोर आली व याचिकेचा विचार करता दि. २६ एप्रिल २०२४ रोजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी NOTA ला एक Fictional Candidate (काल्पनिक उमेदवार) समजता येते का? व त्या पद्धतीने देशात जागृती निर्माण करता येते का? याबद्दल भारतीय निर्वाचन आयोगास विचारणा केली आहे.

'NOTA' हा निवडणूक पर्याय आता जसा आहे तसा नाराजी व्यक्त करण्याचे प्रतीकात्मक साधन न बनता 'नाकारण्याचा अधिकार' बनला तरच तो नकारात्मक मतदानाचे एक अर्थपूर्ण साध्य बनू शकेल.

**गृहीतकांची पडताळणी :**

१) NOTA पर्यायाच्या वापरामुळे मतदारांचा गोपनीयता अधिकार जपला जातो.या गृहितकाची पडताळणी योग्य ठरते, कारण NOTA पर्यायाने मतदाराला गोपनीयतेचा अधिकार सुरक्षित केला आहे. मतदारांना आपल्या मताचा विरोध व्यक्त करताना कोणत्याही प्रकरचा दबाव न येता, त्यांचा अधिकार सुरक्षित ठेवला जातो.

२) NOTA पर्यायामुळे निवडणुकीतील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांची संख्या कमी होईल.या गृहितकाची पडताळणी नकारात्मक आहे, कारण २००९ ते २०२४ पर्यंत गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांची संख्या वाढलेली आहे. NOTA पर्याय लागू होऊनही राजकीय पक्ष उमेदवारांची निवड सुधारित करण्यात कमी यशस्वी ठरले आहेत.

३) NOTA पर्यायामुळे मतदानाची टक्केवारी वाढेल.या गृहितकाची पडताळणी नकारात्मक आहे, कारण NOTA पर्यायाच्या अस्तित्वामुळे मतदानाच्या टक्केवारीत काहीही सुधारणा झालेली नाही. २०१४ पासून २०२४ पर्यंत मतदानाची टक्केवारी स्थिर किंवा कमी झाल्याचे दिसून येते.

४) NOTA पर्यायाचा वापर लोकशाही सुदृढ करण्यासाठी एक साधन ठरेल.या गृहितकाची पडताळणी अंशतः सकारात्मक आहे. NOTA पर्यायाने मतदारांना नकार व्यक्त करण्याचा अधिकार दिला आहे, ज्यामुळे लोकशाहीतील साक्षरता आणि पारदर्शकता वाढली आहे, तरी त्याची प्रभावीता मतदानाच्या टक्केवारीवर अपुरी ठरली आहे.

**निष्कर्ष :**

या संशोधनानुसार, NOTA पर्यायाने काही बाबतीत सकारात्मक परिणाम केले आहेत, जसे की मतदारांचा गोपनीयतेचा अधिकार सुरक्षित राहणे, परंतु निवडणुकीत राजकीय पक्षांच्या उमेदवार निवडीवर त्या प्रमाणात प्रभाव पडलेला दिसत नाही. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या उमेदवारांची संख्या वाढली आहे, आणि मतदानाची टक्केवारी अपेक्षेप्रमाणे वाढलेली नाही. म्हणून, NOTA पर्याय हा प्रत्यक्षात 'नकारात्मक मतदानाचा अधिकार' बनण्यासाठी एक अधिक प्रभावी साधन बनवण्यासाठी सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

**शिफारशी :**

सर्वोच्च न्यायालयाने विचारणा केल्याप्रमाणे भारतीय निवडणूक आयोगाने, NOTA पर्यायास पूर्णतः नकाराधिकार (Right to Reject) म्हणून वापरास मान्यता देता येईल का, याचा विचार करावा.

**संदर्भ :**

१) सर्वोच्च नायालायची निकालपत्रे- i) रिट याचिका क्र. (C) क्रमांक-१६१/२००४, People's Union for Civil Liberties & other V/s. Union of India & other; ii) रिट याचिका क्र. (C) क्रमांक-६३१/२०१७ शैलेश मनुभाई परमार वि. भारत निवडणूक आयोगाद्वारे मुख्य निवडणूक आयुक्त व इतर.
२) असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रीफोर्म्स (ADR) संस्थेचे लोकसभा निवडणुकीसंदर्भातील अहवाल.
३) भारत निर्वाचन आयोग, सांखिकी अहवाल. लोकसभा निवडणूक- २०१४, २०१९ व २०२४; विधानसभा निवडणूक- दिल्ली- २०१३, २०१५ व २०२०; मिझोरम, राजस्थान, छत्तीसगड व मध्यप्रदेश- २०१३, २०१८ व २०२३.
४) पळशीकर, सु. (२००४). *समकालीन भारतीय राजकारण*. प्रतिमा प्रकाशन.
५) व्होरा, रा., & पळशीकर, सु. (२०१०). *भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार*. डायमंड पब्लिकेशन्स.
६) Vachana, V. R., & Roy, M. (2018), NOTA and the Indian Voter. *Economic and Political Weekly*, 53(6).